सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ६९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण: पहिली पीडिता समोर


## नागपूरची युवती पोलिसांसमोर जबाब देणार

### पालकमंत्री यांची जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सविस्तर बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती:**
परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील पहिली पीडिता समोर आली असून ती नागपूर येथील असल्याची माहिती आहे. संबंधित युवती सध्या पोलिसांसमोर आपला जबाब नोंदवत आहे, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.पालकमंत्री बावनकुळे आज अमरावती दौऱ्यावर असून त्यांनी जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सविस्तर बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद , पोलीस आयुक्त राकेश ओला, विशेष तपास पथक प्रमुख शुभम कुमार , स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख किरण वानखडे तसेच आमदार प्रवीण तायडे उपस्थित होते.बैठकीत विशेष तपास पथकाने आतापर्यंत केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला. या प्रकरणात आतापर्यंत ८ आरोपींना अटक करण्यात आली असून पोलिसांनी ७ मोबाईल, एक हार्ड डिस्क व एक टॅब जप्त करून ते न्यायवैद्यकीय तपासणीसाठी पाठवले आहेत. तपास अनेक स्तरांवर सुरू असून पुढील काळात आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले.बावनकुळे यांनी सांगितले की, हा प्रकार अत्यंत गंभीर असून शासन यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यांनी नागरिक व लोकप्रतिनिधींना आवाहन केले की, कुठलेही भडकाऊ, जातीय किंवा धार्मिक वक्तव्य करू नये आणि पोलिसांना निष्पक्ष तपास करू द्यावातसेच त्यांनी पीडितांना आवाहन केले की, कोणत्याही भीतीशिवाय पुढे येऊन पोलिसांना जबाब द्यावा. या प्रकरणातील एकही आरोपी सुटणार नाही, त्यांना कठोर शिक्षा दिली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**स्थानिक नेत्यांनी जबाबदारीने वागणे गरजेचे**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही राजकीय नेत्यांनाही अप्रत्यक्ष इशारा दिला. डॉ.अनिल बोंडे,नवणीत राणा, आणि प्यारे खान यांनी माध्यमांमध्ये वक्तव्ये करण्याऐवजी त्यांच्याकडे काही ठोस माहिती किंवा पुरावे असतील तर ते थेट पोलिसांकडे द्यावेत, असे त्यांनी स्पष्ट केले. माध्यमांमध्ये बोलण्यामुळे तपास भरकटू शकतो, त्यामुळे जबाबदारीने वागणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.



# केंद्र सरकारने महागाई भत्ता २% ने वाढवला

### ५० लाख सरकारी कर्मचाऱ्यांना आणि ६९ लाख पेन्शनधारकांना होईल फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**
सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २% वाढीला मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (१८ एप्रिल) दिल्लीत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याची घोषणा करण्यात आली. यामुळे ५० लाख कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना फायदा होईल.सरकारने महागाई भत्ता ५८% वरून ६०% केला आहे. यापूर्वी ऑक्टोबरमध्ये महागाई भत्ता ५५% वरून ५८% करण्यात आला होता. मागील सुधारणा १ जुलै २०२५ पासून प्रभावी मानली गेली होती, ज्याचे पेमेंट थकबाकीसह (एरियर) करण्यात आले होते.

केंद्र सरकार वर्षातून दोनदा, जानेवारी आणि जुलैमध्ये महागाई भत्ता आणि महागाई मदत मध्ये बदल करते.



या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनात आणि पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ होते.महागाई भत्ता हा सरकारी कर्मचाऱ्यांना दिला जाणारा 'महागाईनुसार जीवनमान समायोजन' (कॉस्ट-ऑफ-लिविंग डजस्टमेंट) आहे. याची गणना मूळ वेतनाच्या टक्केवारीनुसार केली जाते.याचा मुख्य उद्देश वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या वास्तविक उत्पन्नाचे संरक्षण करणे आहे, जेणेकरून त्यांचे वेतन महागाईशी जुळवून घेऊ शकेल.हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा कर्मचारी संघटना ८ व्या वेतन आयोगांतर्गत वेतन संरचनेत मोठ्या बदलांची मागणी करत आहेत. नॅशनल कौन्सिल-जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी (छउ-गउच्) ने आपल्या निवेदनात ३.८३ च्या उच्च फिटमेंट फॅक्टरची मागणी केली आहे.

# अशोक खरातचे निकटवर्तीय जितेंद्र शेळकेंच्या अपघातावर संशय

### कंटेनर चालक जमाल वारिसने जबाबात दिली महत्त्वाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई-** नाशिकमधील भोंदू अशोक खरात याचा निकटवर्तीय आणि शिवनिका ट्रस्टचा उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचा समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीकडे येताना धोत्रे गावाजवळ हा अपघात घडला. शेळके यांच्या कारने समोर असलेल्या कंटेनरला मागून जबरदस्त धडक दिली आणि कार थेट कंटेनरखाली घुसली. या दुर्घटनेत जितेंद्र शेळके आणि त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

ही घटना घडल्यानंतर अपघाताबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे, या अपघातामागे घातपाताची शक्यता असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे पोलिसांनी प्रकरण गंभीरतेने घेत कंटेनर चालकाला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात त्याची सविस्तर चौकशी सुरू असून, या दुर्घटनेमागील नेमके कारण काय, याचा शोध घेतला जात आहे. सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असली तरी प्रकरणाच्या पार्श्वभूमीमुळे तपास अधिक बारकाईने केला जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी शेळके यांची कार भरधाव वेगात होती. वेग नियंत्रणात नसल्यामुळे कार थेट कंटेनरला धडकली आणि त्याखाली अडकली. अपघात इतका भीषण होता की,



कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी मदतीचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

या प्रकरणात कंटेनर चालक जमाल वारिस याने पोलिसांना दिलेल्या जबाबात महत्त्वाची माहिती दिली आहे. तो उत्तर प्रदेशातील अमेठीचा रहिवासी असून, हैदराबादहून अहमदाबादकडे जात होता. दुपारी सुमारे १२ वाजता कंटेनरच्या रेडिएटरचा पाइप लीक झाल्यामुळे वाहन गरम झाले. त्यामुळे त्याने वाहनाचा वेग कमी केला होता. मात्र, त्याने गाडी पूर्णपणे थांबवली नव्हती, असे त्याने स्पष्ट केले.

जमाल वारिसने पुढे सांगितले की, तो रस्त्याच्या कडेला सावकाश गाडी चालवत असताना अचानक मागून जोरदार आवाज आला. त्या वेळी आरशात काही दिसले नाही. नंतर खाली उतरून पाहिले असता कार कंटेनरला धडकलेली दिसली. या घटनेने तोही हादरला होता. त्याच्या या वक्तव्यानंतर अपघाताची दिशा स्पष्ट होत असली तरी काही शंका अद्याप कायम आहेत

# उत्पादन शुल्क विभागातील महिला कर्मचाऱ्याचा मानसिक छळाचा आरोप

### वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात तक्रार, ऑडिओ पुरावे सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-**
अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे सुरू असलेल्या संवेदनशील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आता राज्य उत्पादन शुल्क विभागातील एका महिला कर्मचाऱ्याच्या मानसिक छळाचा गंभीर आरोप समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. संबंधित महिला कर्मचाऱ्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात राजापेठ पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे.तक्रारीनुसार, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडून वारंवार अपमानास्पद वागणूक दिली जात होती. तसेच, तिच्या इच्छेविरुद्ध विविध कामांसाठी दबाव टाकण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या सततच्या त्रासामुळे मानसिक तणाव वाढला असून




कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचा अभाव जाणवत असल्याचा आरोप महिलेने केला आहे.या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पीडित महिलेने पोलिसांकडे ठोस पुरावे सादर केले आहेत. यामध्ये ऑडिओ क्लिप्स, पेन ड्राइव्ह तसेच काही संबंधित कागदपत्रांचा समावेश आहे. या पुराव्यांमुळे आरोपांची सत्यता तपासण्यास महत्त्वाची मदत होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पुराव्यांच्या आधारे तपास अधिक गतीने पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, या तक्रारीनंतर विभागात मोठी खळबळ उडाली असून कर्मचाऱ्यांमध्येही चर्चा सुरू आहे. कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या अशा प्रकारच्या वर्तनाबाबत कठोर भूमिका घेण्याची मागणीही व्यक्त होत आहे.या प्रकरणाचा तपास राजापेठ पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक झींपळीं घींश्ररीं यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंची सखोल चौकशी करण्यात येत असून सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी केली जात आहे. संबंधित अधिकाऱ्याचेही बयान नोंदवले जाणार असल्याची माहिती मिळत आहे.या प्रकरणात पुढे काय कारवाई होते, संबंधित अधिकाऱ्यावर कोणती शिस्तभंगात्मक किंवा कायदेशीर कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने निष्पक्ष तपास करून सत्य बाहेर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.-

# २०२३ मध्येच मंजूर झाले होते महिला आरक्षण विधेयक

### फडणवीसांची पोस्ट होतेय व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई :** मोदी सरकारने महिला आरक्षण आणि परिसीमन संबंधित तीन विधेयके लोकसभेत सादर केली होती. ज्यानंतर शुक्रवारी (ता. १७ एप्रिल) लोकसभेमध्ये या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आले. सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूने मतदान घेण्यात आले. यावेळी विधेयकाच्या बाजूने २९८ मतदान झाले, तर विरोधात २३० मते नोंदवली गेली. हे विधेयक पारित करण्यासाठी दोन तृतीयांश मतदान असणे आवश्यक होते. मात्र, तसे न झाल्याने हे विधेयक कोसळले. ज्यानंतर सत्ताधारी आक्रमक झाले आहेत. तर विरोधकांनी महिलांचा अपमान केल्याचे मत सत्ताधारी व्यक्त करत आहेत. अशातच आता विरोधकांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची २०२३ मधील एक सोशल मीडिया पोस्ट व्हायरल करण्यात आली आहे. ज्यामध्ये त्यांनी महिला आरक्षण विधेयक बहुमताने मंजूर झाल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत.

महिला आरक्षणाचे विधेयक (नारी शक्ती वंदन अधिनियम) सप्टेंबर २०२३ मध्येच संसदेत मंजूर करण्यात आले आहे.



२०२३ मध्ये हे विधेयक लोकसभेत ४५४ मतांनी आणि राज्यसभेत एकमताने मंजूर करण्यात आले होते. हे संविधान (१०६ वी दुरुस्ती) कायदा, २०२३ बनले. परंतु, जरी विधेयक २०२३ मध्ये मंजूर झाले असले, तरी एप्रिल २०२६ मध्ये, या कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित काही सुधारणा विधेयकांवर चर्चा गुरुवारपासून (ता. १६ एप्रिल) सुरू विशेष अधिवेशनात सुरू होती आणि केंद्र सरकारने १६ एप्रिल २०२६ पासून हा कायदा प्रभावीपणे लागू करण्याची अधिसूचना जारी केली होती. मात्र, ज्या कायद्यात सुधारणा करायच्या आहेत तो कायदाच लागू झालेला नव्हता. त्यामुळे सुधारणा कशाची करणार, असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला. त्यामुळे महिला आरक्षणाच्या आडून परिसीमन विधेयक आणण्याचा डाव असल्याचे म्हणत विरोधकांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केले. ज्यामुळे महिला आरक्षण विधेयक ही नामंजूर झाले.

# पंतप्रधान मोदी आज रात्री ८.३० वाजता देशाला संबोधित करणार

### काय बोलणार याची उत्सुकता?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली-** महिला आरक्षण विधेयकासाठी केंद्र सरकारने तीन दिवस विशेष अधिवेशन बोलावले होते. मात्र महिला आरक्षणासह केंद्र सरकारने मतदारसंघ पुनर्रचना आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती हे दोन विधेयक सुद्धा आणले होते. मात्र सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये गुरुवारी व शुक्रवारी २१ तास वादळी चर्चा झाल्यानंतर शुक्रवारी (१७ एप्रिल) महिला आरक्षण दुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाले. नियमानुसार कायद्यात बदल करण्यासाठी दोन तृतीयांश सदस्यांचा होकार अपेक्षित होता. पण २९८ सदस्यांनी विधेयकांच्या बाजूने मतदान केले, तर २३० सदस्यांनी विधेयकांच्या विरोधात मतदान केले. महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्यावर मोदी सरकारला मोठा धक्का बसला असून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसत आहेत. याच सर्व घडामोडींवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (१८ एप्रिल) रात्री ८.३० वाजता देशाला संबोधित करणार आहेत.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी महत्त्वाच्या प्रसंगात ८ वाजता देशातील जनतेशी थेट संवाद साधला आहे. नोटबंदीची घोषणा असो वा कोरोना काळातील टाळेबंदी त्यांनी जनतेला याविषयीची माहिती दिली आहे. तसेच नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी २१ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता देशाला संबोधित केले होते. त्या प्रसंगी, त्यांनी अशी घोषणा केली होती की 'नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स' नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून सुरू होतील आणि त्यासोबतच 'जीएसटी बचत महोत्सवा'चाही शुभारंभ केला जाईल. त्यांनी स्पष्ट केले होते की, या उपक्रमामुळे सामान्य जनतेच्या बचतीला चालना मिळेल आणि दैनंदिन वापराच्या वस्तू पूर्वीपेक्षा अधिक परवडणाऱ्या व सहज उपलब्ध होतील. दरम्यान, १२ मे रोजी रात्री ८ वाजता केलेल्या एका संबोधनात पंतप्रधानांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' बाबतची सविस्तर माहिती दिली होती.

# मुलींशी हाय हॅलो नको तर...; अयानला लव्हगुरुच्या टिप्स; आरोपीनं मुलींना कसं अडकवलं जाळ्यात?

## पोलीस आता लव्ह गुरुच्या शोधात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणाच्या तपास वेग आला आहे. या लैंगिक शोषण प्रकणात नवीन धक्कादायक खुलासे एसआयटीच्या तपासातून समोर आले आहेत. मुख्य आरोपी अयान अहमदने मुलींना जाणीवपूर्वक जाळ्यात अडकवून त्यांचे शोषण करायचा. त्यासाठी त्याने एका तथाकथित 'लव्ह गुरू'ची मदतही घेतली होती.

आरोपीने त्याचा मित्र मानव सुगंधे याच्या कठोरा रोडवरील एका भाड्याच्या फ्लॅटचा सात ते आठ वेळा वापर केला होता. ही माहिती मिळताच पोलिसांनी फ्लॅट मालकाला चौकशीसाठी बोलावले आहे. फ्लॅट मालकाला या कृत्यांची माहिती होती की नाही, याची चौकशी केली जात आहे.



सूत्रांनुसार आरोपी अयान तरुणींशी संभाषण सुरू करण्यासाठी एक अनोखी पद्धत वापरत असायचा. त्याला एका तथाकथित 'लव्ह गुरू'कडून सल्ले मिळाले होते. त्याने अयानला महिलांना कसं जाळ्यात घ्यायचं हे शिकवलं होतं. यामुळे पोलीस आता या 'लव्ह गुरू'च्या शोधात आहेत.

तो अगदी सुरुवातीपासूनच थेट प्रश्न विचारायचा हाय-हॅलो बोलायचं नाही, तू तीच व्यक्ती आहेस का जिला मी तिथे भेटलो होतो? अशा प्रकारे अयान आपला संवाद सुरू करायचा. त्यानंतर मुलगी स्वत: हून तिच्या सर्व माहिती द्यायची. असं करत करत अयान मुलीला तिला आपल्या जाळ्यात अडकवत. हळूहळू त्यांचा विश्वास संपादन करून, मग त्यांना आपल्या जाळ्यात ओढायचा. अयान केवळ सोशल मीडियावर 'हाय-हॅलो' करण्यावर विश्वास ठेवत नव्हता. दोन वर्षापूर्वी एका तरुण गुरूने त्याला संवादाचे कौशल्य शिकवले होते.

'आप वही हो ना? अशा संभ्रम निर्माण करणाऱ्या प्रश्नाने तो संवादाची सुरुवात करत असायचा. समोरची मुलगी 'हो' किंवा 'नाही' असे उत्तर न देता सविस्तर बोलायची. तेथूनच ती अयानच्या जाळ्यात अडकण्याची. इन्स्टाग्रामवर १८ हजार फॉलोअर्स असलेल्या या नराधमाने सोशल मीडियाचा वापर 'हंटिंग ग्राउंड 'सारखा केला. अमरावतीच्या कठोरा नाका परिसरातील एका टू-बीएचके फ्लॅटमध्ये अयानने काही मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त केले.

## संपादकीय ......

# रुपाली चाकणकरांचे, 'ती मी नव्हेच!'

*महाराष्ट्राच्या राजकारणात अधूनमधून वादळं उठत असतात, काही दिवस गाजतात आणि मग शांत होतात. पण काही प्रकरणं अशी असतात की, ती संपूर्ण व्यवस्थेलाच हादरवून टाकतात. भोंदूबाबा म्हणून ओळखल्या जाणार्या अशोक खरात प्रकरणाने नेमकं हेच केलं आहे. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेल्या खुलाशांनी अनेक राजकीय नावे समोर आणली आणि त्यात रुपाली चाकणकर यांचे नाव विशेषत: चर्चेत आले. या सगळ्या घडामोडीत चाकणकर यांची भूमिका 'ती मी नव्हेच' अशीच राहिलेली दिसते. पण हा नुसता नकार पुरेसा आहे का, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे. दमानिया यांनी पत्रकार परिषदेत मांडलेले आकडे आणि तपशील हे केवळ आरोप म्हणून दुर्लक्षित करता येतील का? एखाद्या व्यक्तीने १७७ वेळा फोन करणं, एका दिवशी २२ मिनिटांचं संभाषण होणं हे सगळं केवळ योगायोग म्हणता येईल का? सामान्य नागरिकाच्या दृष्टीने हे आकडे धक्कादायक आहेत. राजकारणात असलेल्या व्यक्तींनी अशा संशयास्पद व्यक्तींशी संपर्क ठेवला, तर त्यामागचा उद्देश काय असू शकतो, हा प्रश्न नैसर्गिक आहे. चाकणकर यांचा दावा आहे की, हे आरोप बेछूट, कपोलकल्पित आणि बदनामी करण्यासाठी आहेत. पण मग त्या आरोपांना ठोसपणे खोडून काढण्यासाठी त्यांनी पुढे येऊन स्पष्ट भूमिका का घेतलेली दिसत नाही?*

*या प्रकरणात सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे चाकणकर यांची दीर्घकाळची शांतता. आरोप झाले, चर्चा रंगली, माध्यमांमध्ये बातम्या झळकल्या. पण त्या सुरुवातीला फारशा पुढे आल्या नाहीत. एक-दोन निवेदने, सोशल मीडियावर पोस्ट आणि आरोपांचे खंडन इतक्यावरच त्या थांबल्या. जर एखाद्या व्यक्तीवर गंभीर आरोप झाले असतील आणि ते खोटे असतील, तर त्या व्यक्तीने आक्रमकपणे समोर येऊन सत्य मांडणं अपेक्षित असतं. पण येथे उलट चित्र दिसतं. ही शांतता संशय अधिक गडद करते. चाकणकर यांची भूमिका 'आमचा काही संबंध नाही' अशी आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, कोणत्याही आर्थिक व्यवहारात, जमीन व्यवहारात किंवा इतर कोणत्याही दुष्कृत्यात त्यांचा सहभाग नाही. हे विधान ठाम आहे, पण त्याला पूरक अशी पारदर्शकता मात्र दिसत नाही. जर खरंच काहीच संबंध नसेल, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर फोन कॉल्स का झाले? इथेच चाकणकर यांची भूमिका दुटप्पी वाटू लागते. एका बाजूला त्या स्वत:ला पूर्णपणे निर्दोष ठरवतात, तर दुसर्या बाजूला त्या तपास प्रक्रियेपासून काहीशा दूर राहिल्यासारख्या दिसतात. जर त्या निर्दोष असतील, तर एसआयटीच्या चौकशीला सामोरे जाणं त्यांच्यासाठी संधीच ठरू शकते. स्वतःचं नाव स्वच्छ करण्याची संधी. मग त्या पुढाकार का घेत नाहीत? 'मला चौकशीसाठी बोलवा, मी सर्व माहिती देईन' असं ठामपणे का म्हणत नाहीत? याउलट, त्यांच्या कुटुंबियांची चौकशी झाल्याची दिसते. त्यांची बहीण प्रतिभा चाकणकर आणि तन्मय चाकणकर यांची आठ तास चौकशी झाली. ही चौकशी अनेक प्रश्न निर्माण करते. जर या प्रकरणाशी काहीही संबंध नसेल, तर कुटुंबीयांचा तपासात समावेश का झाला? आणि चौकशीनंतर केवळ आरोप फेटाळून लावणं हे पुरेसं उत्तर ठरू शकतं का? राजकारणात आरोप-प्रत्यारोप नवीन नाहीत. पण प्रत्येक वेळी एक गोष्ट अपेक्षित असते ती म्हणजे उत्तरदायित्व. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींनी केवळ आरोप नाकारून चालत नाही; त्यांनी पारदर्शकतेने वागणं आवश्यक असतं. विशेषत: जेव्हा प्रकरण एका भोंदूबाबाशी संबंधित असतं आणि त्यातून समाजात चुकीचे संदेश जाऊ शकतात.*

# बँकिंग कायद्यानुसार हे अधिकार रिझर्व्ह बँकेचे

# शिक्षक बँकेवरील कार्यवाहीस आक्षेप

**अध्यक्षांसह तीन संचालकांचा मुद्दा : सहकार आयुक्तांचे पत्र**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

बँकिंग सुधारणा अधिनियमांनुसार १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शिक्षक सहकारी बँकेच्या अध्यक्षांसह तीन संचालकांचे पद रिक्त करण्याबाबतचे आदेश कालच विभागीय सहनिबंधकांकडून देण्यात आले. मात्र बँकिंग कायद्यानुसार हे अधिकार रिझर्व्ह बँकेचे असल्याने संचालकांना पदमुक्त करण्याचा अधिकार निबंधकांना नाहीच, असा आक्षेप शिक्षक बँकेच्या अध्यक्षांनी घेतला आहे. बँकिंग कायदा सुधारणा अधिनियमांतर्गत ज्या बँकेच्या संचालकांनी १० वर्षे कालावधीपेक्षा जास्त कालावधी संचालक म्हणून पूर्ण केला असेल असे संचालक या कायद्यातील तरतुदीनुसार पदावर राहण्यास अथवा पुन्हा निवडून येण्यात अपात्र राहतील, असे ते आदेश आहेत. त्या अंतर्गत विभागीय सहनिबंधकांनी कालच जिल्हा परिषद शिक्षक बँकेचे अध्यक्ष गौकुलदास राऊत यांच्यासह संचालक रा. ना. गावंडे, अजयानंद पवार तसेच प्रफुल्ल शेंडे यांना पदमुक्त करण्याबाबतचे पत्र जारी केले आणि बँकिंग राजकारणात एकच खळबळ उडाली. मात्र दुसरीकडे बँकेचे अध्यक्षांसह अन्य संचालकांनी ही कारवाई नियमाला धरून नसल्याचे सांगितले आहे. बँकिंग सुधारणा अधिनियमांत अपात्रता धारण केलेल्या संचालकांना संचालक मंडळातून काढून टाकण्याची तरतूद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये नाहीच. त्यामुळे बँकांच्या निबंधकांना अपात्र संचालकांना काढून टाकण्याची किंवा पदमुक्त करण्याची कार्यवाहीसुद्धा करता येणार नाही, हा अधिकार केवळ रिझर्व्ह बँकेचा असल्याचे सहकारी संस्थांचे अपर आयुक्त तथा विशेष निबंधक नागनाथ यगलेवाड यांच्या सहीचे पत्र संचालकांनी दिले आहे. त्यामुळे काल विभागीय सहनिबंधकांडून शिक्षक बँकेच्या संचालकांवर करण्यात आलेली कारवाई अवैध असल्याचा निर्वाळा या संचालकांनी दिला आहे.

कार्यवाहीबाबत संभ्रम

बँकिंग सुधारणा अधिनियमांनुसर १० वर्षे कुठल्याही सहकारी बँकेचे संचालकपद धारण करणाऱ्या संचालकांना पदावर राहता येत नाही, अशी तरतूद आहे.

मात्र त्याबाबत आता कार्यवाही कुणी करावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष निबंधकांनी हे अधिकार आरबीआयकडे असल्याचे सांगितल्याने आता सहकार निबंधकांची पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> या अधिनियमातील तरतुदींनुसार अपात्र ठरलेल्या संचालकांना पदावरून मुक्त करण्याचा अधिकार विभागीय निबंधकांना नाहीच. त्यामुळे काल त्यांनी कार्यवाहीबाबतचे दिलेले पत्रसुद्धा अवैध आहे. सुधारित तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरू आहे. त्यामुळे कालच्या कार्यवाहीला कुठलाच अर्थ नाही. शिवाय बँकिंग फेडरेशनकडून या प्रकरणात न्यायालयात देखील याचिका दाखल करण्यात आली आहे.
>
> **गोकुलदास राऊत,** अध्यक्ष, जि. प. शिक्षक सहकारी बँक.

# स्मिता रविकिरण पाटील (औगड) यांना डॉक्टरेट

## शेळी-मेंढीपालनासाठी ठरणार 'गेमचेंजर' संशोधन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची विद्यार्थिनी स्मिता रविकिरण पाटील (औगड) यांनी प्राणिशास्त्र विषयात केलेल्या अभ्यासपूर्ण संशोधनामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (झह.ऊ.)' ही मानाची पदवी मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे अमरावतीसह संपूर्ण विदर्भात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.स्मिता पाटील यांनी सादर केलेला संशोधन प्रबंध हा शेळी व मेंढ्यांवरील जंतांच्या प्रादुर्भावावर आधारित असून, विदर्भातील या विषयावरील पहिला संशोधन प्रबंध मानला जात आहे. ग्रामीण भागात शेळी-मेंढीपालन हा अनेक कुटुंबांचा प्रमुख व्यवसाय असल्याने, या संशोधनाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

**संशोधनाचा प्रभाव**

शेळी व मेंढ्यांमध्ये विविध जंतांमुळे होणारे आजार, वेळेवर निदानाचा अभाव आणि योग्य उपचार न मिळाल्यामुळे अनेक पशुपालकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. स्मिता पाटील यांच्या संशोधनामुळे या आजारांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि प्रभावी उपचार शक्य होणार आहेत. त्यामुळे ग्रामीण पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**मार्गदर्शन व सहकार्य**

या संशोधनासाठी डॉ. प्रदीप एस. देशमुख (सहयोगी प्राध्यापक) यांचे मार्गदर्शक लाभले. तसेच मा.डॉ. एस. एन. माळोदे.संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती. प्रो. डॉ.संतोष पवार (प्राणिशास्त्र विभाग प्रमुख),डॉ. एस. पेंढे, डॉ. विजय हटकर,डॉ. भूपेश कांबळे, डॉ गजानन बंगाले.डॉ. वैभव पाटील,डॉ. अनिल मोहोड.डॉ. परीक्षित कातखेडे,डॉ. नंदकिशोर अवघड, डॉ.तुषार गावंडे, तनुज ठाकरे, संकेत उगले, संजय मदनेकर यांच्यासह अनेक प्राध्यापक व तज्ज्ञांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# धामणगाव रेल्वे येथे जप्त वाळूचा लिलाव सोमवारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धामणगावरेल्वे,**

तालुक्यातील सलाबतपूर येथे अवैधरीत्या साठवलेली अंदाजे २५० ब्रांस वाळू महसूल विभागाने जप्त केली आहे. या वाळूसाठ्याचा जाहीर लीलाव सोमवार २० एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता धामणगावरेल्वे तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. सलाबतपूर येथील गट सर्व्हे क्रमांक ८३/२ मध्ये अवैध स्वरूपात मोठ्या प्रमाणात वाळूचा साठा आढळून आला होता. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, चांदूररेल्वे यांनी संबंधित साठ्यावर जप्तीची कारवाई करून लीलावासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवला. महसूल व वनविभागाच्या शासननिर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी या लीलावास मान्यता दिली आहे. लीलावात सहभागी होणाऱ्या इच्छूक बोलीधारकांनी २५ टक्के अनामत रक्कम बोली सुरू होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक आहे. निश्चित वेळेनंतर येणाऱ्या कोणत्याही बोलीधारकास लीलाव प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही, असे आवाहन तहसीलदार अभय घोरपडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

## सीबीएससी परिक्षेत स्कूल ऑफ स्कॉलर ची


# कू.ऋचा रुपेश खडसे हिची ९५ टक्के मिळवून उत्तुंग भरारी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** - अमरावती शहरातील स्कूल ऑफ स्कॉलर्स निंभोरा येथे शिकत असलेल्या डॉ .रुपेश खडसे यांची मुलगी कुमारी ऋचा रुपेश खडसे ही दहावीला सी बी सी मध्ये शिकत असताना रोज नियमित अभ्यास करून तिने दहावीच्या नुकत्याच लागलेल्या सी बी एस सी च्या निकालामध्ये ९५ टक्के मिळवले आहे त्यामुळे ह्या तिच्या निकालामुळे शाळेमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे तिने आपल्या केलेल्या मेहनतीने अभ्यासाने जिद्दीने केलेला विश्वास आई-बाबाच्या स्वप्न साकार करण्यासाठी तिने दहावीच्या परीक्षेमध्ये चांगल्या प्रकारे अभ्यास करून ९५% बनवले आहेत याचे श्रेय सर्वप्रथम ती तिचे वडील डॉक्टर रुपेश खडसे, पुनम रुपेश खडसे तसेच शाळेचे प्राचार्य डॉ. संतोष कुमार शाळेचे शिक्षक मयूर नाकडे, दिपाली पवार ,कृष्णा बोराडे, शितल जाधव, सुरेंद्र शिरसाट, रश्मी बजाज ,अर्चना पाटील यांनी खूप मेहनत घेऊन तिला शिकवले त्यामुळे ऋचा रुपेश खडसे हिने यांना आपले गुरु मानून त्यांचे आभार मानले आहे व पुढे बारावी मध्ये सुद्धा ९९ टक्के मिळवण्याची आत्मविश्वास तिने दाखवला आहे आणि सर्व मुलींनी आपण शिकावं व आपल्या आई वडिलांचे नाव व आपल्या कुटुंबाचे नाव कमवावे व देशाची प्रत्येक महिला ही अग्रेसर राहो असे तिने आपले मत व्यक्त केले.

# सीबीएसई दहावी परीक्षेत दिल्ली पब्लिक स्कुल चा विद्यार्थी सर्वेश उगले चे यश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय माध्यमिक बोर्ड (सीबीएसई )दहावी परीक्षेत दिल्ली पब्लिक स्कुल अमरावती चा विद्यार्थी सर्वेश रुपाली सुनिल उगले याने ८९% टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश मिळवले आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून,भविष्यात अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करण्याचा त्याचा मानस आहे.सर्वेश चे वडील श्री. सुनिल उगले हे अमरावती महसूल विभागात मंडळ अधिकारी या पदावर कार्यरत असून, आई सौ.रुपाली उगले या गृहिणी आहे.सर्वेशला मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये मंत्रालयात अवर सचिव पदावर कार्यरत असणारे मोठे वडील (काका) श्री. अनिलकुमार उगले व मोठी आई (काकू) सौ. शीतल उगले यांचा मोलाचा वाटा आहे. वारकरी कुटुंबात जन्मलेल्या सर्वेश ने लहानपणापासून शिक्षणासोबत संस्काराचे धडे आपले आजोबा स्व. रामदासपंत उगले व आजी श्रीमती. सुमनताई उगले यांच्याकडून घेतले आहे. त्याने आपले या यशाचे श्रेय आईवडील,दिल्ली पब्लिक स्कुल चे प्राचार्य,शिक्षकवृंद, बहीण डॉ. आयुषा, अनन्या, आत्या, काकाजी, नातेवाईक, मित्रमंडळ, हितचिंतक यांना दिले आहे. तसेच त्याच्या या यशाबद्दल उगले व आखरे परिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# चिखलदरा पर्यटन नगरीचे तापमान ४१ अंशसेल्सियस

## पर्यटक व नागरिकांमध्ये प्रचंड चिंता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चिखलदरा**

विदर्भातील प्रसिद्ध पर्यटन नगरी चिखलदरा येथे यंदा उष्णतेने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. सामान्यतः थंड हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या या हिल स्टेशनचे तापमान प्रथमच ४१ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले असून पर्यटक आणि स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, चिखलदरा हे नेहमीच थंड आणि आल्हाददायक हवामानासाठी प्रसिद्ध राहिले आहे. मात्र यावेळी वाढत्या उष्णतेमुळे या ओळखीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तज्ज्ञांच्या मते, हा पर्यावरणीय असंतुलन आणि हवामान बदलाचा संकेत आहे. तापमानातील या अनपेक्षित वाढीचा परिणाम केवळ पर्यटकांच्या संख्येवरच नव्हे, तर स्थानिक जीवनशैली, जलस्रोत आणि वन्यजीवांवरही नकारात्मक स्वरूपात दिसून येऊ शकतो. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, मागील काही वर्षांत वृक्षतोड, कमी होत चाललेले जलस्रोत आणि वाढते प्रदूषण, यामुळे हवामानात हा बदल दिसून येत आहे. योग्यवेळी ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर चिखलदऱ्याचे नैसर्गिक सौंदर्य आणि थंड हवामान धोक्यात येऊ शकते. प्रशासन आणि पर्यावरणप्रेमींनी अधिकाधिक वृक्षारोपण करणे, जलसंधारणावर भर देणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून चिखलदऱ्याची ओळख कायम राखता येईल.

# पंढरपुरात उभारणार वाल्मीकी मठ

## भातकुली तालुक्यात घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८भातकुली,** भातकुलीजवळच असलेल्या खालकोनी या गावातून तीर्थक्षेत्र पंढरपुरात वाल्मीकी मठ उभारण्याची संकल्पना करण्यात आली. राज्यातील वारकरी संप्रदायातूनच हा निर्णय घेण्यात आला आहे. खालकोनी येथे झालेल्या हनुमान जयंती महोत्सवात कीर्तनाच्या व्यासपीठावरून हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. हजारो भाविकांच्या साक्षीने जाहीर झालेल्या या संकल्पामुळे राज्यभरातील वारकरी बांधवांमध्ये उत्साहाची लाट उसळली आहे. वारकरी भूषण रवींद्र महाराज पाटील खालकोनीकर यांनी आपल्या आक्रमक व प्रभावी कीर्तनातून पंढरीची वारी हीच खरी जीवनशुद्धी असा संदेश देत भाविकांना थेट साद घातली. वर्षातून एकदा वारी नाही, तर जीवन अपूर्णच, असा स्पष्ट इशारा देत त्यांनी पायी वारीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी जाहीर करण्यात आले की, महर्षी वाल्मीकी पायी दिंडी सोहळा १९ जून २०२६ रोजी खालकोनी, सामदा काशीपूर येथून आरंभ होणार असून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. १८ जुलै रोजी पंढरपुरात आगमन होऊन १९ जुलैपासून दिंडी संचालक रवींद्र महाराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली भागवत कथेचा प्रारंभ होईल. २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त गोपाळपूर प्रदक्षिणेनंतर दिंडीची सांगता करण्यात येणार आहे.

दरम्यान, पंढरपुरात वाल्मिकी मठ उभारण्यासाठी ६५ एकराच्या पश्चिमेस चंद्रभागेच्या तीरी १५ गुंठे जागा खरेदीचा निर्णय अंतिम टप्प्यात असून, यासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी उभारण्याचा निर्धार व्यक्तकरण्यात आला. आता मागे हटायचे नाही, मठ उभारायचाच! असा निर्धार व्यक्त करत भाविकांनी या धार्मिक चळवळीला राज्यव्यापी स्वरूप देण्याचा इशारा दिला. खालकोनी येथील हा संकल्प आता केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता राज्यभरातील वारकरी बांधवांना एकत्र आणणारा ठरत आहे. या सोहळ्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# तिवसात डीपी शॉर्टसर्किट; ट्रान्सफॉर्मर जळाला

## नागरिकांना रात्रभर अंधार



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८तिवसा** शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील श्री देवराव दादा हायस्कूल परिसरात महावितरणच्या डीपीला शॉर्टसर्किट होऊन ट्रान्सफॉर्मर जळून खाक झाल्याची घटना घडली. अचानक लागलेल्या आगीने मोठा भडका उडाला; मात्र नगरपंचायतीच्या अग्निशमन दलाने तत्काळ धाव घेत आग आटोक्यात आणली.या घटनेमुळे परिसरातील वीजपुरवठा मध्यरात्रीपासून दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत खंडित राहिला. उष्णतेच्या तीव्र लाटेत नागरिकांना रात्रभर अंधारात राहावे लागल्याने मोठा त्रास सहन करावा लागला.दरम्यान, दोन दिवसांपूर्वीही राष्ट्रीय महामार्गावरील पेट्रोल पंप परिसरात अशीच घटना घडल्याने महावितरणच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.कनिष्ठ अभियंता अनिल मिश्रा यांनी सांगितले की, तीव्र उष्णतेमुळे स्पार्किंग होऊन ट्रान्सफॉर्मर पेट घेतल्याची शक्यता आहे. सकाळीपासून दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून लवकरच वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर



# काँग्रेस जिल्हाध्यक्षपदासाठी जगताप-साबळे रिंगणात

## शहराध्यक्षपदासाठी भय्या पवार आघाडीवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

शहर जिल्हा जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये नेतृत्व बदलासाठी इच्छुकांचे अर्ज घेण्याची प्रक्रिया संघटन सृजन अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून शुक्रवार १७ एप्रिल हा अर्ज भरण्यासाठी अंतिम दिवस होता. या अंतिम दिवशी जिल्हाध्यक्ष पदाकरिता दोन अर्ज दाखल झाले तर शहराध्यक्ष पदासाठी एक अर्ज दाखल झाला आहे. जिल्हाध्यक्ष पदाकरीता प्रकाश साबळे व वीरेंद्र जगताप यांनी तर शहराध्यक्ष पदासाठी भैय्या पवार यांनीही अर्ज दाखल केला आहे.

जिल्हाध्यक्ष पदाकरिता दोन दिवसात एकही अर्ज दाखल झाला नाही. अंतिम दिवशी मात्र माजी आमदार वीरेंद्र जगताप तर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी अर्ज दाखल केला. उल्लेखनीय असे की जिल्हाध्यक्ष पदाकरीता सुधाकर भारसाकळे इच्छुक असून तेसुद्धा अर्ज दाखल करतील, असे मानले जात होते, मात्र त्यांनी अंतिम दिवसपर्यंत अर्ज दाखल केला नसल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे शहराध्यक्ष पदाकरिता गुरुवारी सात ते आठ


अर्ज दाखल झाले असून अंतिम दिवशी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष भैया पवार यांनी अर्ज दाखल केला.

संघटन सृजन अभियानातर्गत शहर व जिल्हा काँग्रेसमध्ये बदल होतील अशी अपेक्षा जरी व्यक्त केली जात असली तरी तीन दिवसांपासून शहरातील आढावा घेण्यासाठी आलेले निरीक्षक वरिष्ठ स्तरावर काय अहवाल देतात याकडे आता लक्ष लागले आहे. प्रकाश साबळे यांनी शुक्रवारी (ता.१७) एआयसीसी निरीक्षक अहमद यांच्याकडे अमरावती जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्या समवेत पक्ष संघटनेसंदर्भात सविस्तर चर्चा करून काँग्रेसला प्रायव्हेट लिमिटेड कंपनी समजणाऱ्यांपासून पक्षाला वाचवावे, अशी आग्रही मागणी केली. आम्ही पक्ष विरोधातले नसून हेकेखोर व्यक्ती विरोधात आमची भूमिका आहे आणि ती भविष्यात पण राहील, असे साबळे यांनी नमूद केले. विधान परिषद, जिल्हा परिषद, लोकसभा व विधानसभा निवडणुकीत स्थानिक पातळीवर जे घडले, त्याबाबत प्रकाश साबळे यांनी त्यांची स्पष्ट भूमिका मांडली.

# एमआयएम नगरसेविकेला नोटीस

## तीन अपत्ये प्रकरण, ७ दिवसात मागितला खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

महानगरपालिकेच्या निवडणूक नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून एमआयएमच्या महिला नगरसेविका नुझात परवीन शाकिर हुसेन यांना महापालिका प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संबंधित नगरसेविकेला ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

वॉर्ड क्रमांक २१-बी मधून निवडून आलेल्या या नगरसेविकेवर दोनपेक्षा अधिक मुले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणूक नियमांनुसार, दोनपेक्षा

जास्त अपत्ये असलेले उमेदवार निवडणूक लढवण्यास अपात्र ठरतात. या पार्श्वभूमीवर त्यांच्याविरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर महानगरपालिकेच्या सचिव विभागाने ही कारवाई केली आहे. महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वीही महानगरपालिकेत अशाच प्रकारचे एक प्रकरण समोर आले होते.

त्यावेळी संबंधित नगरसेविकेला राजीनामा द्यावा लागला होता. त्यामुळे या प्रकरणाकडे प्रशासन आणि राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.नगरसेविकेकडून मिळणाऱ्या खुलाशाच्या आधारे पुढील कारवाई निश्चित केली जाईल, असे मनपा प्रशासनाने म्हटले आहे.

# स्वच्छता अभ्यास समितीचा अहवाल सादर; करारात बदल सुचवणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती-**

अमरावती महापालिकेची आमसभा सोमवारी (ता. २० एप्रिल) आहे. महापालिकेने गठीत केलेल्या स्वच्छता अभ्यास समितीने स्वच्छतेच्या मुद्यांवर चर्चा करून विसंगती गत दिड महिन्यात शोधून काढल्या व सर्व शिफारशीसह तो अहवाल आमसभेत 'ठेवला जाणार आहे. करारनामा व निविदा प्रक्रियेमधील अटी शर्थीमध्ये तफावत आढळून आलेल्या बाबींची 'शिफारस ही समिती आमसभेमध्ये ठेवणार आहे. महापालिकेत सभागृह अस्तित्वात आल्यानंतर



शहरातील स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सात वर्षासाठी २६० कोटीचे स्वच्छतेचे कंत्राट देऊनही अस्वच्छता पसरली आहे. महापालिका प्रशासन वार्षिक ४० ते ४५ कोटी रुपये स्वच्छतेवर खर्च करते, त्या तुलनेत नागरिकांना कुठल्याही स्वच्छतेच्या सुविधा दिल्या जात नाही. रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिगार लागले आहेत. नाल्या अस्वच्छ आहेत, कचरा जाळल्या जातो, असे अनेक आरोप केल्यानंतर अभ्यास गट स्थापन करण्यात आला१९ सदस्यीय या समितीने दीड महिन्यात तीन सभा घेऊन संपूर्ण करारनामा व अटी शर्ती निविदा प्रक्रिया व त्यातील अटी शर्ती या विषयावर अभ्यास केला. करारनामा व निविदा प्रक्रियेमध्ये बऱ्याच तफावत आढळून आल्यानंतर करारनाम्यात पाच ते सहा बाबींचा समावेश करण्याची शिफारस अभ्यास गटाने केली आहे. त्यामध्ये नवीन गाड्या घेणे, फवारणी धुवारणी करणे, ब्लिचिंग पावडर उपलब्ध करून देणे यासारख्या अनेक बाबींचा समावेश आहे.

# आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते सानुग्रह अनुदान वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अचलपूर**

येथील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत येणाऱ्या बोर्डी नाला मध्यम प्रकल्पामुळे संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या बदल्यात शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले. या प्रकल्पासाठी सन २००६ ते २०१३ या कालावधीत सरळ खरेदी पद्धतीने शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने शासनाच्या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रुपये ५ लाखांच्या दराने सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले असून या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त



शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.हा अनुदान वाटप सोहळा शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मंगला माता संस्थान, पिंपरी तळेगाव (चांदूर बाजार - परतवाडा रोड) येथे पार पडला. या कार्यक्रमात पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष अनुदानाचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाला अचलपूर मतदारसंघाचे आमदार मा. प्रवीणभाऊ वसंतराव तायडे प्रमुख उपस्थित होते व त्यांच्या शुभहस्ते लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. आमदार तायडे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रमास कार्यकारी अभियंता वीरेंद्र रामचंद्र चौधरी, सहाय्यक अभियंता श्रेणी-१ नीरज शेषराव मावळे, कनिष्ठ अभियंता शेखर परचाके, सुनील परमेश्वर, सय्यद इम्रान, कैलास गिलोरकर, अनुरेखक अविनाश डवरे, लेखा परीक्षक वैभव सवाई, वरिष्ठ लिपीक प्रमोद खाकसे तसेच कनिष्ठ लिपीक सुरेश टाळे व राजू कुमारे आदी अधिकारी उपस्थित होते.तसेच तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे, प्रफुल बर्वे, नंदुभाऊ बर्वे (चांदूर बाजार) व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्याला अमरावती विभागीय शिक्षक मेळावा व सत्कार समारोह

## १०० अनाथ विद्यार्थ्यांना सायकल भेट अध्यक्ष शेखर भोयर यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती -**

भाजप शिक्षक आघाडी व शिक्षक महासंघ अमरावती विभागाच्या संयुक्त विद्यमाने अमरावती विभागीय शिक्षक मेळावा व सत्कार समारंभाचे आयोजन १९ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आलेले आहे. या मेळाव्यामध्ये विभागातील शंभर अनाथ विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात येणार असून उत्कृष्ट कार्य शिक्षक करणाऱ्या व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांनी दिली.

स्थानिक राजापेठस्थित श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्र परिषदेमध्ये या कार्यक्रमाविषयी माहिती देताना, त्यांनी सांगितले की, कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री



नितीन गडकरी उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रताप जाधव महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकास मंत्री अशोक उईक, कामगार मंत्री आकाश पुंडकर व शालेय शिक्षण व गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत.अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अधिकाधिक संख्येने या मेळाव्याला विभागातील शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. भोयर यांनी सांगितले की, दरवर्षी १९ एप्रिल रोजी सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम राबविला जातो. त्यातूनच यावर्षी अनाथ विद्यार्थ्यांना सायकली वाटप करण्याचा नियोजन करण्यात आले. पत्रकार परिषदेमध्ये विस्मय ठाकरे, संदीप जुनघरे, आशिष देशमुख, सुधाकर गावंडे अनिल बडगुजर, अमित बोदडे उपस्थित होते.

# पुसला व निंभी येथील टोलनाके टोलमुक्त करा

## वरुड-मोर्शी तालुक्यातील वाहनधारकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९वरूड-** वाहन खरेदी करताना रोड टॅक्स भरला, जीएसटी दिला, व्यावसायिक कर आणि इन्कम टॅक्सही भरतो सर्वसामान्य नागरिकांनी टोलच्या रुपाने पुन्हा पुन्हा पैसे का मोजावे?' असा संतप्त सवाल करत वरुड आणि मोर्शी तालुक्यातील नागरिकांनी केंद्र सरकार विरोधात एल्गार पुकारला आहे. केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नावे असलेले निवेदन वरुडच्या तहसीलदारांना सादर करण्यात आले असून पुसला व निंभी टोलनाका स्थानिक नागरिकांसाठी तत्काळ टोलमुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नागरिकांनी सरकारवर 'कायदेशीर लुटी'चा गंभीर आरोपकेला आहे. केंद्र सरकारच्या नियमानुसार ६० किलोमीटरच्या आत दुसरा टोल नाका नसावा, असा संकेत असतांनाही वरुडपासून अवघ्या १२ किलोमीटरवर 'पुसला' आणि ४५ किलोमीटरवर 'निंभी' असे दोन टोलनाके आहेत.पुसला आणि निंभी येथील वरुड व मोर्शी टोलनाके तालुक्यातील सर्व वाहनधारकांसाठी पुर्णपणे टोलमुक्त करावेत व विविध कर भरल्यानंतर टोलच्या माध्यमातुन होणारे सर्वसामान्यांचे शोषण थांबवावे, अशी मागणी निवेदनातुन करण्यात आली आहे. जर सरकारने या निवेदनाची तातडीने दखल घेतली नाही तर टोलमुक्तीसाठी तीव्र आंदोलनाचा इशारा सोपान ढोले व स्थानिक नागरिकांच्यावतीने देण्यात आला आहे.

# पर्जन्यमापक नोंदीत गोंधळ; शेतकऱ्यांसमोर संकटाची चाहूल

## मंडळांच्या आकडेवारीची तफावत शेतकऱ्यांसाठी तोट्याचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८पथ्रोट-** मागील दोन दिवसांपासून उष्ण तापमानाचा आकडा वाढता आहे. अशातच शासनाने मंडळामध्ये बसविलेले पर्जन्यमापक यंत्रापैकी पथ्रोटचे पर्जन्यमापक यंत्र हे ओलिताच्या सानिध्यात असल्यामुळे इतर मंडळांच्या तुलनेत तापमानाच्या आकडेवारीत फरक दिसून येत आहे. सदरचा फरक हा हवामान आधारित विमा कंपनीकडे वर्ग करण्यात येत असल्याने पुढे त्यांच्याकडून मिळणारी मदत ही शेतकऱ्यांसाठी तोट्याचे संकेत देत आहे.



शासनाकडून निर्धारित केलेल्या मंडळात परतवाडा, देवमाळी, परसापूर, पथ्रोट, रासेगाव व असदपूर, अशा सहा ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आले आहे. उष्ण तापमानाची आकडेवारी या पर्जन्यमापक यंत्रामध्ये मोजल्या जाते. तेथून ती थेट शासन दरबारी पोहोचविली जाते. मग उष्ण तापमानाची ती आकडेवारी शासनदरबारातून विमा कंपनीकडे वर्ग करण्यात येते. त्यावेळी शेतकऱ्यांना हवामान आधारित पीकविमा मंजूर करताना सदरच्या आकडेवारीवरून नेमके मदत देण्याचे निकष ठरविले जाते. ज्या पर्जन्यमापक यंत्रावरील आकडेवारी अधिक उष्णतामानाची तिथे मदत मंजूर केली जाते. परंतु फक्त ओलित क्षेत्राच्या सानिध्यात असलेल्या पर्जन्यमापक यंत्रामुळे जर का उष्ण तापमानतेचा आकडा शासनदरबारी कमी नोंद होत असेल तर त्याठिकाणावरून विमा कंपनीला पाठविण्यात आलेल्या कमी आकडेवारीमुळे शेतकऱ्यांना हक्काची मदत मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे. गुरुवारी (ता. १७) १२.५३ मिनिटांनी पथ्रोट येथे उष्ण तापमानाचा आकडा हा ३७ डीग्री सेल्सिअस होता. त्यानंतर अवघ्या दहा मिनिटांच्या कालावधीत परतवाडा, देवमाळी चाळीस डीग्री, परसापूर बेचाळीस डीग्री, पथ्रोट सदतीस डीग्री, रासेगाव व असदपूर एकेचाळीस डीग्री सेल्सिअसची नोंद घेण्यात आली. सूर्यदेवतेचे उष्ण तापमान एकसारखे असताना ओलित व कोरडवाहू क्षेत्रात लावण्यात आलेल्या पर्जन्यमापक यंत्रावर तफावत दाखविणारी आकडेवारी दिसत असल्याने हवामान विभागाने सदरचे पर्जन्यमापक यंत्र हे योग्य ठिकाणी लावावे जेणेकरून हवामान आधारित पीकविमा सारख्या शासनाच्या योजनांचा शेतकऱ्यांना व्यवस्थित लाभ मिळणे सोयीचे होईल. नाहीतर मग सूर्यदेव पथ्रोटवरच मेहरबान होते का? असा प्रश्न उपस्थित होऊन वाद उत्पन्न होण्याआधीच हवामान विभागाने शेतकऱ्यांच्या हितासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# राष्ट्रीय महिला आयोगाकडून प्रकरणाचा व्हीसीव्दारे आढावा

## एसआयटीची कसून चौकशी सुरु, सोशल मिडीया साईटवरून ४१ अकाऊंट डिलीट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८परतवाडा**

लैगिंक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमदचा वाढदिवस काही पोलिस कर्मचारी साजरा करतानाचा व्हीडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला. या बाबीचा गुन्ह्याच्या तपासावर प्रभाव पडू नये व नागरिकांच्या मनात गुन्ह्याच्या पूर्णतः पारदर्शक तपासाबाबत कुठलाही संभ्रमराहू नये यासाठी परतवाडा पो. स्टे. येथील १ अधिकारी व २ अंमलदारांना पुढील चौकशी निर्णयाच्या अधीन राहून निलंबित करण्याचे आदेश एसपी विशाल आनंद यांनी दिले आहे.

### 'त्या' सहा पैकी ३ सस्पेंड

प्रकरणाचे गांभीर्य बघता स्थानिकपोलिसांकडून किंवा एसआयटीमध्ये असलेल्या अधिकारी अंमलदारांकडून गुन्ह्याचा तपास प्रभावित होऊ नये म्हणून सहा अधिकारी अंमलदार कंट्रोल रुमला अटॅच केले होते. यामध्ये एपीआय सलीम शेख पोस्टे परतवाडा, हेकॉ. अब्दुल नाझीम अब्दुल कलीम, शुभमदिलीप शर्मा , मयूर सदानंद गुरव, मोहन धनराज वावरे आणि पुरुषोत्तम मधुकर बावनेर याचा समावेश होता.

### एसपी विशाल आनंद यांचे आदेश

यापैकी एपीआय सलीम शेख, पोलिस अंमलदार शुभम शर्मा आणि मयूर गुरव या तिघांना एसपी विशाल आनंद यांनी निलंबित करण्याचे आदेश दिले आहे.

### फ्लॅट मालकासह १० जणांची चौकशी

आरोपी अयान याने पीडितांच्या शोषणासाठी मानव सुगंधे याचा भाड्याचा कठोरा रोड स्थित फ्लॅट वापरला होता




त्या फ्लॅटची झडती घेण्यात आली तसेच तेथील पंचनामा सुद्धा करण्यात आला आहे. फ्लॅट मालकाला सुद्धा चौकशी साठी बोलावण्यात आलेले आहे. गुरुवारपासून १० लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते मात्र अटक करण्यात आली नाही

### संबंधित कॅफेचा पंचनामा

अयान हा पीडितांना कठोरा रोड अमरावती येथील कॅफे रॉयल, १०, अचलपूर येथील कॅफे फ्रेंडस् टाऊन, व परतवाडा येथील कॅफे सोशल जंक्शन (आता बंद असलेला) अशा ज्या ३ कॅफे मध्ये भेटला होता त्या ठिकाणचा आणि एका पीडितेला तो वझ्झर डॅम येथील गार्डन मध्ये भेटला होता, तेथील सुद्धा पंचनामा करण्यात आलेला आहे.

### ४१ अकाऊंट डिलीट

पीडितेचे/घटनेच्या संदर्भात फोटो, व्हीडीओ प्रसारित होत असलेल्या फेसबुक, इंस्टाग्राम, टेलीग्राम, यू ट्यूब अशा सोशल टेलीग्राम, यू ट्यूब अशा सोशल मीडिया साईट्स वरून एकूण ४१ अकाउंट साइबर सेल च्या मदतीने डिलीट करण्यात आलेले आहे.

### पीडितांनी तक्रार करावी

पीडितांनी समोर येऊन आपली तक्रार/बयानद्यावे यासाठी रक्ळ मधील महिला पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्यामार्फत संपर्क करण्यात येत आहे व पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या सोयीनुसार पो. नि. यशोधरा मुनेश्वर यांना मोबाईल क्र. ९७७३९७५६३५ वर कधीही संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे. पीडितेचे नाव व ओळख गुप्त ठेवण्याची काळजी पोलिसांकडून घेण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणी शुक्रवारला राष्ट्रीय महिला आयोगाने व्हीसी द्वारे सदर प्रकरणाचा आढावा घेतला आहे.

# अक्षय तृतीयानिमित्त बाजारात खरेदीसाठी गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील बाजारपेठ गजबजली आहे. शहरातील वाहन विक्री दालनात, सराफा बाजारात मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. अक्षयतृतीयेला कुठल्याही वस्तूची खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे घर, वाहन, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी केली जात आहे. दुचाकी, चारचाकी वाहनांचे नागरिकांनी बुकिंग केले असून अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर वाहन घरी नेणार आहेत. वाहन खरेदीसाठी इलेक्ट्रिक वाहनांना पसंती दिली जात आहे. तसेच आपल्या बजेटनुसार सेकंड हँड गाड्यांना देखील मोठीमागणी आहे.अक्षय तृतीयेच्या निमित्ताने नवीन सह सेकंड हँड वाहन बाजारात देखील मोठ्या प्रमाणावर उलाढाल होईल, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली आहे. अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी टिव्ही, फ्रिज, वॉशिंग मशिन, मायक्रोवेव्ह ओवन यांसारख्या गृहोपयोगी वस्तूंची खरेदी केली. तसेच वाढत्या उष्णतेपासून गारवा मिळावा. यासाठी एसी, कूलरची देखील मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. विशेषतः तरुणांनी मोबाईल, लॅपटॉप, टॅब, स्मार्टवाच यांसारख्या इलेक्ट्रॉनिक गॅजेटची खरेदी केली.



### घागरीला मोठी मागणी


अक्षयतृतीयेला पूर्वजांचे घागर भरण्याची पंरपरा आहे. आंबे, घागर खरेदी केले जात आहे. घागर विक्रीसाठी विक्रेत्यांनी शहरातील विविध परिसरात दुकाने थाटली आहेत. घागरीचे दर ७० पासून ते १५० रुपयांपर्यंत आहेत. पूजा-साहित्य, केळीचे पाने, गवरी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी बाजारात होत आहे.

# फ्लॅटमध्ये क्राईम सीनची पुनर्रचना; अयानचा तपासात मोठा खुलासा

## पोलिसांकडून घटनाक्रमाची बारकाईने पडताळणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

संपूर्ण राज्यात सर्वत्र खळबळ उडवणाऱ्या लैंगिक अत्याचार आणि ब्लॅकमेल प्रकरणातील आरोपी अयान अहमदच्या तपासात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीने चौकशीदरम्यान स ांगितले की, पहिल्या ब्रेकअपनंतर तो 'प्लेबॉय' बनला होता. एवढेच नाही तर, चार भिंतीआडचे कृत्य जबरदस्तीने नव्हे तर त्यांच्या समंतीनेच होते, असे अयानने चौकशीत सांगितल्याची माहिती आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण मानसिक आजारापेक्षा एका विशिष्ट मानसिकतेशी आणि जीवनशैलीशी अधिक संबंधित आहे. अयान अहमद सोशल मीडियावर सक्रिय होता आणि त्याची जीवनशैलीदेखील याप्रकरणात एक महत्त्वाचा घटक म्हणून समोर आली आहे.



**फ्लॅटमध्ये जाऊन क्राईम सीन**

कठोरा रोडवरील 'तो' फ्लॅट आता या प्रकरणाचा मुख्य 'हॉटस्पॉट' ठरला असून, त्याठिकाणी चालणाऱ्या कुकृत्याची भीषणता पाहून तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे. एसआयटीने गुरुवारी कठोरा नाका रोडवरील त्या फ्लॅटमध्ये जाऊन क्राईम सीन रिक्रिएट केला. धक्कादायक बाब म्हणजे, मानव सुगंधे या आरोपीने स्वतःच्या नावाने हा फ्लॅट भाड्याने घेतला होता आणि तो अयान अहमदला 'तासिका तत्त्वावर' मुलींचे लैंगिक शोषण करण्यासाठी पुरवत होता. अयानचा मोबाईल फोनचा मोठा व्यवसाय होता आणि तो इंस्टाग्रामवरील पेड प्रमोशनच्या माध्यमातूनही चांगले उत्पन्न मिळवत असे. त्याचे सुमारे १८,००० फॉलोअर्स होते, ज्यामुळे सोशल मीडियावरमीडियावर त्याची वर्चस्व होते. मोठी कमाई असूनही तो मित्र आणि कुटुंबीयांकडून पैसे उधार घेत राहिला, आणि पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तो त्या पैशांचा वापर आपली आलिशान आणि ऐशोआरामी जीवनशैली कायम ठेवण्यासाठी करत होता. अयान अहमद सोशल मीडियाद्वारे महिलांशी संपर्क साधायचा आणि हळूहळू त्यांच्याशी मैत्री करायचा. त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी तो सुमारे चार ते पाच महिने घालवायचा, जेणेकरून त्यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसेल. एकदा काविश्वासनिर्माणझाला आहे असे त्याला वाटले की, तो त्यांच्याकडे शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी करायचा किवा त्यासाठी दबाव टाकायचा.

### मानव असा बनला राक्षस

आर्वी येथील मानव हा येथे बीबीए करत आहे. पीयूष नामक तरुणदेखील यापूर्वी तो फ्लॅट अशाच कामासाठी उपलब्ध करून द्यायचा. त्यानंतर त्याने अमरावती सोडले. पीयूषच्या ओळखीतील व्यक्तीने अयानला मानव त्याचा भाड्याचा फ्लॅट तासाप्रमाणे देतो, असे सूचविले. त्यानंतर अयान याने मानवशी संपर्क साधला. त्यानंतर तेथे एक हजार रुपये प्रति तासाप्रमाणे विकृतीचा खेळ सुरू झाला.

# १० जूनला दक्षिण आशियातील सर्वात मोठे एफटीओचा अमरावतीत शुभारंभ

## उद्घाटनासाठी पीएम नरेंद्र मोदीं येण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अंबानगरी अर्थात अमरावतीमधील बेलोरा विमानतळाजवळ साकारात असलेल्या दक्षिण आशियातीलसर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण केंद्राचे (एफटीओ) चे उद्घाटन आता अगदी जवळ आले आहे. विश्वसनीय सूत्रांनुसार, या एफटीओचे उद्घाटन येत्या १० जून २०१६ रोजी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.सूत्रांनुसार, या ऐतिहासिक उद्घाटन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित करण्याचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. जर पंतप्रधान मोदी अमरावतीत आले, तर हा प्रसंग जिल्ह्यासाठी एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद यश मानला जाईल. उल्लेखनीय असे की, एअर इंडिया आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) महाराष्ट्रातील अमरावती येथे दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण केंद्राच्या (एफटीओ) ची घोषणा केली होती. हे एफटीओ टाटा ग्रुपची विमान कंपनी एअर इंडियाद्वारे विकसित केले जात असून, औपचारिक शुभारंभ १० जून रोजी होणार आहे. एफटीओ दरवर्षी १८० व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देईल.



### वार्षिक १८० कमर्शियल पायलट

एफटीओचे वार्षिकलक्ष्य १८० व्यावसायिक एफटीओचाव्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देणे आहे अमरावतीमध्ये उभारण्यात येणारे हे एफटीओ भारतीय विमान वाहतूक क्षेत्राला अधिक आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. हे एफटीओ केवळ तरुणांना वैमानिक बनण्याचे त्यांचे स्वप्न साकार करण्याची संधीच देणार नाही, तर - एअर इंडियाचे जागतिक दर्जाची विमान कंपनी बनण्याचे ध्येयदेखील अधिक मजबूत करेल.

### ३१ सिगल-इंजिन आणि ३ ट्विन-इंजिन विमाने

एअर इंडियाच्या या एफटीओमध्ये प्रशिक्षणासाठी विमाने - ३१ सिगल-इंजिन आणि ३ ट्विन-इंजिन उपलब्ध असतील. असे वृत्त आहे की, एखाद्या भारतीय विमान कंपनीद्वारे देशात सुरू करण्यात येणारे हे अशा प्रकारचे पहिले मोठे एफटीओ आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) एअर इंडियाला पुढील ३० वर्षांसाठी अमरावतीमधील हे डीजीसीए-मान्यताप्राप्त एफटीओ विकसित आणि - संचालित करण्याचे कंत्राट दिले आहे.

**३,००० हून अधिक रोजगार-** एमएडीसी आणि एअर इंडिया यांच्या संयुक्त उपक्रमामुळेकेवळविमान वाहतूक क्षेत्रात ३,००० हून अधिक नवीन रोजगार निर्माण होणार नाहीत, तर कौशल्यविकास, तांत्रिक सेवा, पुरवठा साखळी आणि लहान व्यवसायांनाही चालना मिळेल यात शंका नाही.

# लैंगिक शोषण आरोपी अयान अहमदच्या घराजवळील दुकाने रिकामी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८परतवाडा-**

अमरावती जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या मुलींचे लैंगिक शोषण व त्याचे व्हिडीओ, फोटो व्हायरल प्रकरणाला आता नवे वळण आले असून मुख्य आरोपी अयान अहमद याच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.



अयान अहमदच्या घराजवळ असलेल्या व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने रिकामी करण्यास सुरुवात केली आहे. परिसरातील वातावरण तणावपूर्ण झाल्यामुळे व्यवसाय करणे कठीण झाल्याचे दुकानदारांचे म्हणणे आहे. विशेषतः कापड व्यापाऱ्यांनी सकाळपासूनच आपले साहित्य, फर्निचर आणि माल काढून घेत जागा खाली करण्यास सुरुवात केली.

या घटनेमुळे परिसरात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. दरम्यान, काही हिंदुत्ववादी संघटनांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला इशारा दिला आहे. संबंधित आरोपीचे घर तात्काळ पाडण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, प्रशासनाने तत्काळ कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.सद्यस्थितीत प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहेत.


# बडनेरा येथे वैद्यकीय महाविद्यालय, बोधिभूमी संकुल व ५१ फूट बुद्धमूर्तीच्या कामाची पाहणी

## प्रकल्प प्रगतीपथावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



अमरावतीतील बडनेरा परिसरातील कोडेश्वर रोड येथे सुरू असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बोधिभूमी सांस्कृतिक संकुल तसेच ५१ फूट उंच भगवान गौतम बुद्धांच्या भव्य मूर्तीच्या कामाची पाहणी ठरींळ ठरपर यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत केली. या पाहणी दौऱ्यात प्रकल्पांची प्रगती समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद करत कामाचा वेग कायम ठेवण्याच्या सूचना दिल्या.दीर्घ पाठपुराव्यानंतर साकार होत असलेल्या या महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे बडनेरा व अमरावतीच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे राणा यांनी सांगितले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यातील नागरिकांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, तसेच वैद्यकीय शिक्षणासाठीही नवे पर्याय निर्माण होतील.याशिवाय सुमारे १०० कोटी रुपयांच्या बोधिभूमी सांस्कृतिक संकुलामुळे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना व्यासपीठ मिळणार आहे. या ठिकाणी उभारली जाणारी ५१ फूट उंच भगवान गौतम बुद्धांची मूर्ती परिसराचे प्रमुख आकर्षण ठरणार असून, धार्मिक व पर्यटनदृष्ट्या या भागाचे महत्त्व वाढणार आहे.पाहणीदरम्यान आ.रवि राणा यांनी अधिकाऱ्यांना कामाची गुणवत्ता अबाधित ठेवत नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश दिले. हे प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा वाढवणार नाहीत, तर स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधीही निर्माण करतील. परिसराचा सर्वांगीण विकास साधणे हा यामागील मुख्य उद्देश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.या दौऱ्यात युवा स्वाभिमान पक्षाचे मार्गदर्शक सुनिल राणा, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, नायब तहसीलदार टिना चव्हाण तसेच मंडळ अधिकारी श्री. धोटे उपस्थित होते.



अधिकाऱ्यांनी प्रकल्पांच्या प्रगतीबाबत सविस्तर माहिती देत काम वेळेत पूर्ण करण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली.तसेच अजय घुले, जगदीश अंबाडकर, सुनिल निचत, मुकेश उसरे, शुभम उंबरकर आदींचीही उपस्थिती होती. एकूणच या पाहणीमुळे प्रकल्पांना अधिक गती मिळणार असून, बडनेरा परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# परतवाडा प्रकरणात धक्कादायक खुलासे; कॅफे व फ्लॅटमध्ये तरुणींचे करायचा शोषण

## ५०० रुपये प्रति तास दरात अयानने आठवेळा वापरला 'तो' फ्लॅट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील तरुणींचे लैंगिक शोषण व अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणात तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याने अमरावती शहरातील कठोरा नाका परिसरातील द कॅफे रॉयल १० येथे काही तरुणींना आणून त्यांच्यासोबत अश्लील कृत्ये करत शोषण केल्याचा आरोप आहे.तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार, संबंधित कॅफे पूर्वीपासून वादग्रस्त असल्याचेही समोर येत आहे. यापूर्वी पोलिसांनी येथे धाड टाकून मुला-मुलींना ताब्यात घेतल्याची नोंद आहे. तसेच, या परिसरातील काही कॅफेंमध्ये अश्लील प्रकार सुरू असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये होती.आरोपीने केवळ एका ठिकाणीच नव्हे, तर कठोरा नाक्यावरील फ्लॅट, अमरावती शहरातील इतर कॅफे, परतवाडा, अचलपूर तसेच वझ्झर धरण परिसरातील एका कॅफेमध्येही तरुणींवर अत्याचार केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.दरम्यान, पोलिसांकडून या सर्व ठिकाणांची पडताळणी सुरू असून, संबंधित कॅफे आणि ठिकाणांबाबत अधिक तपास करण्यात येत आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आरोपीविरोधात कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




# NDPS गुन्ह्यात १२ वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद

## दोन आरोपी आंध्र प्रदेश पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती शहरात मोठी कारवाई करत गुन्हे शाखा आणि आंध्र प्रदेशातील नार्कोटिक्स सेलने संयुक्त मोहिमेत सन २०१४ पासून फरार असलेल्या छऊझड गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेतले. दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ४ वाजल्यापासून ही मोहीम राबविण्यात आली.चित्तूर (आंध्र प्रदेश) येथील नार्कोटिक्स सेलने अमरावती पोलीस आयुक्तांकडे फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी मदत मागितली होती. न्यायालयाने संबंधित आरोपींविरुद्ध गैरजामीन वॉरंट जारी केले होते. त्यानुसार अमरावती गुन्हे शाखेने विशेष पथक तयार करून शोधमोहीम सुरू केली.या कारवाईत अफसर खान, शेख राजू, महेश साहू, शेख शहजाद उर्फ साजिद आणि अक्रम शहा उर्फ बब्बा यांना ताब्यात घेण्यात आले. यापैकी तीन आरोपींना न्यायालयीन पडताळणीनंतर नोटीस देऊन सोडण्यात आले, तर दोन मुख्य आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी आंध्र प्रदेश पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.या यशस्वी कारवाईमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या छऊझड प्रकरणाला गती मिळाली आहे.

